संविधानीक / वैधानिक पदे निर्माण करतांना सदर पदावर नियुक्त केलेल्या मान्यवरांना मा.सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश यांच्याशी सल्लामसलत केल्याशिवाय मा.सर्वोच्च न्यायालयाचे व मा. उच्च न्यायालयाचे न्यायाधीशांचा समतुल्य दर्जा न देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक:- अग्रक्र-२०१७/प्र.क्र.९१/३०
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १४ जुलै, २०१७

<u>प्रस्तावना :-</u>

राज्य शासनाच्या विविध विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील निर्माण केलेल्या काही संविधानिक / वैधानिक पदावर कार्यरत असणाऱ्या पदाधिकारी यांना मा.सर्वोच्च / उच्च न्यायालयाच्या न्यायधिशांशी समतुल्य दर्जा देण्यात येत असल्याबाबत निदर्शनास आले आहे.

तथापि, असा दर्जा विहित करण्यापूर्वी मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्रमांक 805 of 1993 (T.N Seshan Vs. Union of India), 791/ 1993 (Cho Ramaswami Vs. Union of India), 825 of 1993 (B. K. Rai & another Vs Union of India) and 268 of 1994 (Common Cause Vs. Union of India) च्या संदर्भात दिनांक १४ जुलै, १९९५ रोजी दिलेल्या न्याय निवाड्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मा. सर न्यायाधीश यांच्याशी सल्लामसलत केल्याशिवाय कोणतीही कार्यवाही करु नये, असे निर्देश दिले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त नमूद यचिकेमध्ये दिलेल्या निवाड्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

"We would like to impress upon the Government that it should not confer equivalence or interfere with the Warrant of Precedence, if it is likely to affect the position of High Court or Supreme Court Judges, however, pressing the demand may be made without first seeking the views of the Chief Justice of India."

२. मा. सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्तल्लेखीत निर्देश विचारात घेऊन आवश्यक ती कार्यवाही राज्य शासनाच्या सर्व विभागाकडून होण्यासाठी निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

शासन आता असा निर्णय घेत आहे की, " मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांच्या अनुमतीशिवाय ज्या विभागांनी त्यांच्या अधिपत्त्याखालील पदाधिकाऱ्यांना मा. सर्वोच्च / उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचा समतुल्य दर्जा दिला असल्यास ते आदेश तात्काळ रद्द करण्याची कार्यवाही करावी. महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील सर्व विभागांनी, यापुढे मा.सर्वोच्च न्यायालयाचे मा.सरन्यायाधीश यांच्याशी सल्लामसलत केल्याशिवाय संविधानिक / वैधानिक किंवा कोणत्याही पदावरील पदाधिकाऱ्यांना मा.सर्वोच्च न्यायालयाचे किंवा मा. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांचा समतुल्य दर्जा देण्यात येऊ नये. "

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०७१४१७०८०९७२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Rajagopal Devara

Digitally signed by Rajagopal Devara
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=289c22071cb598fd531df022c29ec89276ede6f8aa500df11ff3b1b80b6962cd, serialNumber=742368efbe36a0eb883c99378363 83a8be11eb15decb8029209db2953176e175, cn=Rajagopal Devara
Date: 2017.07.26 11:15:48 +05'30'

(राजगोपाल देवरा)
प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी

प्रत:-

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
२) सर्व अपर मुख्य सचिव, मंत्रालयीन विभाग
३) मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
४) सर्व प्रधान सचिव / सर्व सचिव, मंत्रालयीन विभाग,
५) अध्यक्ष / उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
६) सभापती / उप सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे सचिव
७) विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद यांचे सचिव
८) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
९) निवडनस्ती (कार्यासन-३०).